# मानवी मूल्यांचा पुण्य सोहळा

प्रा.डॉ.विणा विजय पाटील

"जीव जीवांत घालावा ।आत्मा आत्म्यांत मिसळावा ।
राह राहोंचा शोध घ्यावा । परांतराचा ॥
(दासबोध)
जन्म कर्मच मे विप्यमेवं यो वेत्ति तत्वतः।
त्यत्ता देह पुर्नजन्म नैती मामेति सोडर्जून "

या भारत देशात अनेक संत, महात्मे, युग पुरूष होऊन गेले. सर्वांनीच समस्त मानव कल्याणासाठी देह झिजवला.मानवाने प्रगती केली ती अशा थोर लोकांनी दाखविलेल्या मार्गावरूनच.पण जस जसा मानव समाज पुढे चालत गेला तसा तसा माणूस स्वतःचे माणूसपण हरवून बसला. लहानपण, तरूणपण, प्रेम,वात्सल्य, खोड्या या देखील सगळ्या कप्यूटराईसड झाल्या.

पैसा हा माणसाचा केंद्रबिंदू झाला आणि जास्तीत जास्त मिळविण्यासाठी त्याने स्वतःला वेळेचे गुलाम बनवून टाकले. प्रत्येक गोष्टीचा त्याने स्वतःच वेळापत्रक बनवून घेतले. इतक्या वाजता उठायचे, अमूक वेळेत सकाळचे सर्व कामे आटोपून प्रपंच्याला लागायचे,एवढेच नव्हे तर देवपूजेचा देखील टाईम टेबल ठरवून घेतला. पण हे सर्व कशासाठी फक्त पैसा मिळविण्यासाठी आणि त्यासाठी वाट्टेल ती तडजोड ! आज घडीला सभोवतालच्या घटनांचा आलेख बघता माणूस हा माणूस राहीला आहे की नाही याची शंका येते. मानवी मूल्ये काय आहेत. आज हेच माणसाला समजावयाची वेळ आली आहे माणूस असून देखील स्वतःला स्वतःची ओळख नाही.मानवी मूल्ये म्हणजे स्वतःची मूल्ये आत्मपरिक्षण,कारण सगळ्यांची सुरूवात स्वयंम पासूनच होते. पण हें सर्व जरी माहित असले तरी याची सुरूवात कोणी व कुठून करायची हा देखील मोठा प्रश्न. पण असा एकही प्रश्न नाही की ज्याचे समाधान नाही.योगायोग असा आहे की, श्री.सत्यसाई सेवा समिती व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ व ३ फेब्रुवारी रोजी कुसूम सभागृहात हा मानवी मूल्यांवर आधारीत कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम श्री शारदा भवन एज्युकेशन संचलीत महाविद्यालयाअंतर्गत घेण्यात आला. जिवोत्सव या दोन दिवसांच्या उत्सवात विद्यार्थीनी जो अनुभव घेतला तो त्यांच्या जीवनातील अविस्मरणीय ठरेल. कारण या उत्सवात तरूणाईने स्वतः रचलेल्या व सादर केलेल्या नाटीका, एक पात्री प्रयोग, स्कीट व पी.पी.टी व्दारे हे दाखवून दिले की समाजात पसरलेली अपप्रवृत्ती व अंधानुकरण यामुळे स्वतःचाच नाही तर देशाचा सुध्दा ऱ्हास होतो. जिवोत्सवाच्या माध्यमातून एक आगळे वेगळे व्यासपीठ आयोजकांनी निर्माण करून दिले व त्याव्दारे आपल्या कला गुणांचे प्रदर्शन करण्यास व एकमेकात मिसळण्याची संधी मिळाली. येथे विद्यार्थीच हा एकमेव केंद्रबिंदू होता. हा अतिशय सुंदर संयोग होता की अशा प्रकारचा प्रयोग पहिल्यांदाच नांदेड मध्ये सौ.स्नेहलताबाई पाटील खतगावकर, महिला अध्यक्ष श्री सत्यसाईसेवा समिती,नांदेड यांच्या पुढाकाराने घेण्यात आला. या जिवोत्सवामध्ये एकापेक्षा एक उत्कृष्ट नाटीका सादर करण्यात आल्या व त्याबरोबरच मा.निमीशभाई पंड्या, उपाध्यक्ष अखिल भारतीय श्री सत्यसाई सेवा संघटना, यांचे मानवी मूल्यांवरचे मार्गदर्शन हे देखील विद्यार्थ्यांनी आत्मसात केली. निमीशभाईंनी आपल्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांच्या मनाशी संवाद साधला. मानवी मूल्यांची आपल्या जीवनात किती आवश्यकता आहे याची जाणीव त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना पुढे मांडले.सतबुध्दी,सुविचार, चिंतन,मनन, एकाग्रता, या सर्व गोष्टींचा अवलंब केल्याने जीवन किती सफल व समाधानी होते याबद्दल स्वानुभव कथन केले. विद्यार्थ्यांनी सुध्दा त्यांना मनापासून प्रतिसाद दिला. व त्यांचा प्रत्येक विचार हा त्यांच्या करीता प्रेरणास्त्रोत ठरला. येथे होता तो फक्त उल्हास,उत्साह आणि जल्लोष, या उत्सवा दरम्यान प्रकर्षाने एका गोष्टीची जाणीव झाली ती म्हणजे मोठ्या शहरांपेक्षा नांदेड सारख्या छोट्या शहरांमध्ये अशा उत्सवांची सुरूवात झाली तर नवीन संकल्पना व जाणिवांचा जागर होईल. जे सर्वांसाठी हितकारक ठरेल. जिवोत्सव हा मानवी मूल्य सांगणारा कार्यक्रम तर झालाच आणि त्याव्दारे विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाटकांचा सर्वांनीच,संपूर्ण सभागृहाने आनंद लुटला. येथे होता फक्त शारदा भवन परिवार कारण कोणता विद्यार्थी,कोणत्या महाविद्यालयाचा, कोणत्या वर्गाचा, कोणत्या जातीचा व कोणत्या गावाचा या सर्व गोष्टी गौण होत्या. तो होता फक्त शारदाभवन परिवाराचा आणि त्याहून ही सुंदर असा योग की ज्या महाविद्यालयाचा संघ किंवा विद्यार्थी हा परितोषिकांचा मानकरी ठरला त्याला समस्त नांदेडकरांचे लाडके, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. अशोकरावजी चव्हाण साहेब यांच्या हस्ते विजेता व उपविजेता संघाला पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. याहून दुसरे अजून काहीच नाही असे जाणवत होते आणि साहेबांनी सुध्दा तरूणांना साद घातली व आजकालच्या ज्वलंत प्रश्नांवर आपले विचार मांडले व मागील काही घडलेल्या घटनांवर त्यांनी चिंता पण व्यक्त केली. व भविष्यात अशा सर्व घटनांना तरूणाईच पायबंद घालू शकते व नायनाट करू शकते अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. श्री.सत्यसाई बाबा यांचा आशीर्वाद त्यांच्या पाठीशी सदैव आहे. जिवोत्सव बरेच काही सांगून गेला, आता वाट आहे ती आचरणाची, आयोजकांनी केलेले सार्थ प्रयत्न फलश्रुती कडे जाऊ देत. श्री शारदाभवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव मा.उदयरावजी निंबाळकर साहेब आणि श्री सत्यसाई सेवा समिती,नांदेडचे पदाधिकारी राऊतखेडकर, सुरेश काळे, सौ.माधुरी काळे, परदेशी,अनिल पत्रे व सरनाईक या सर्वांचे जिवोत्सव आयोजित केल्याबद्दल आभार, आणि जिजाऊ साकारणाऱ्या सौ.चैताली खटी यांचे देखील आभार.

PRAJAWANI, SUNDAY 10 FEBRUARY 2013, NANDED.